# वि.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे कार्यालय, अकोला.

पहा :— १. जिल्हा न्यायालय, अकोला कार्यालयीन आदेश दिनांक १०.०३.२०२६.
२. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक B(Gen)-1001/2015/882, दि. २२ सप्टें.२०१५.
३. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार—क मधे दि. २८ ऑगस्ट, २०१५ रोजी प्रकाशीत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांची अधिसुचना क्रमांक Rule/P. 1605/2015 दि. २६.०८.२०१५.
४. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक B(Gen)-1001/2026/74, दि. २१.०१.२०२६.
५. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक B(Gen)-1001/2026/340, दि. ०७.०३.२०२६.
६. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांची अधिसुचना क्रं. ओ—३९०२/२०२६/८०६, दि.१८.०५.२०२६.

.........

**कार्यालयीन आदेश** **दिनांक: ०९ / ०७ / २०२६.**

कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणा—या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक B(Gen)-1001/2015/882] दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ व महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार—क मधे दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ रोजी प्रकाशीत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांची अधिसुचना क्रमांक Rule/P. 1605/2015 दिनांक २६ ऑगस्ट २०१५ मधील नियम ४ नूसार अकोला न्यायीक जिल्हयाचे मुख्यालयी **''जिल्हा लैंगिक सचेतना आणि अंतर्गत तक्रार समिती''** उक्त क्रमांक १ वरील आदेशान्वये नव्याने स्थापित/गठीत करण्यात आलेली आहे.

उपरोक्त क्रमांक ६ वर नमूद मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे दिनांक १८.०५.२०२६ रोजीचे अधिसुचनेनुसार सदरहू समितीच्या सदस्य सचिव श्रीमती आर.एन.बंसल, ४थे सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) तथा अतीरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, अकोला यांचे पदनामात बदल झालेला आहे.

**तसेच उक्त क्रमांक ४ व ५ वरील मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्रातील निर्देशांनुसार, 'तृतीयपंथी व्यक्ती (हक्काचे संरक्षण) अधिनियम, २०१९' च्या कलम ११ तसेच 'तृतीयपंथी व्यक्ती (हक्काचे संरक्षण) नियम, २०२०' च्या नियम १३ अंतर्गत तृतीयपंथी व्यक्तींशी संबंधित तक्रारीकरिता तक्रार अधिकारी (Complaint Officer) म्हणुन मुख्य न्यायदंडाधिकारी, अकोला यांची नियुक्ती करण्यात येत आहे.**

त्यास्तव उपरोक्त समितीमध्ये पुढील प्रमाणे अनुषंगीक बदल करण्यात येत आहे.

....२

"<u>जिल्हा लैंगिक सचेतना आणि अंतर्गत तक्रार समिती</u>"

| कार्यालयाचे नांव | सभासदाचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अकोला यांचे कार्यालय व त्यांचे अधिपत्या खालील सर्व न्यायालय/ कार्यालय/ आस्थापना. | १) श्रीमती एस.आर.गायकवाड, तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, अकोला. | अध्यक्ष |
| | २) श्रीमती आर.एन.बंसल, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), अकोला. | सदस्य सचिव |
| | ३) श्रीमती पी.ए.जमाईवार, सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), अकोला. | सदस्य |
| | ४) श्री.आर.आर.देशपांडे, जिल्हा सरकारी अभियोक्ता, अकोला. | सदस्य |
| | ५) श्रीमती आर.जी.चांडक,माजी प्राचार्य,अकोला विधी महाविद्यालय,अकोला | सदस्य |
| | ६) श्रीमती मंगला ए. पांडे, विधिज्ञ, अकोला वकील संघ, अकोला. | सदस्य |
| | ७) श्रीमती एल.बी.दांदळे, विधिज्ञ, अकोला वकील संघ, अकोला. | सदस्य |
| | ८) सौ.आर.बी.दिगंबर, अधिक्षक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला प्रतिनियुक्ती प्रभारी प्रबंधक, कौटुंबिक न्यायालय, अकोला | सदस्य |

पुढे असे निर्देश देण्यात येत आहेत की, उपरोक्त समितीने "The Gender Sensitization and Sexual Harassment of Women at the District Courts in the State of Maharashtra & Goa (Prevention, Prohibition and Redressal ), Regulation 2014, अंतर्गत घालून दिलेल्या तरतूदींनुसार त्यांचे कामकाज करावे व प्राप्त तक्रारींची उक्त नियमांनुसार चौकशी करावी.

तसेच तृतीयपंथी व्यक्तींशी संबंधीत प्राप्त तक्रारीबाबत तक्रार अधिकारी (Complaint Officer) मुख्य न्यायदंडाधिकारी, अकोला यांचेकडुन प्राप्त अहवालावर **'तृतीयपंथी व्यक्ती (हक्काचे संरक्षण) अधिनियम, २०१९' च्या कलम ११ तसेच 'तृतीयपंथी व्यक्ती (हक्काचे संरक्षण) नियम, २०२०' च्या नियम १३ अंतर्गत नियमांनुसार कार्यवाही करावी.**

तसेच उपरोक्त समितीने त्यांचे कामकाजाचा अहवाल उक्त अधिसुचनेतील नियम १६ अन्वये <u>त्रैमासिक अहवाल</u> (जानेवारी ते मार्च, एप्रिल ते जुन, जुलै ते सप्टेंबर व ऑक्टोबर ते डिसेंबर या प्रमाणे) निम्नस्वाक्षरीतास सादर करावा. ज्यामध्ये (क) तक्रारींची संख्या, (ख) तक्रारींचे स्वरूप, (ग) चौकशी पूर्ण करण्यात आलेली प्रकरणे, (घ) चौकशीची कार्यवाही सुरू असल्यास चौकशीची सद्यस्थिती यांचा अंतर्भाव असावा.

उपरोक्त नमुद न्यायीक अधिका–यांच्या पदनामात भविष्यात बदल झाल्यास सदरहू आदेशास कोणत्याही प्रकारची बाधा येणार नाही व उपरोक्त अधिकारी त्यांचे अध्यक्ष/सदस्य या नियुक्तीचे पदाचे कामकाज पाहातील.

उपरोक्त समिती गठित झाल्याचे दिनांकापासून दोन वर्षाकरिता वैध राहील.

उपरोक्त आदेश तात्काळ प्रभावाने लागू राहील.

(द.पां.सातवळेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
**अकोला.**

---

जा.क्रं./प्रशासन/२४५४/२०२६.
जिल्हा न्यायालय, अकोला
दिनांकः ०९ जुलै, २०२६.

**प्रत** :—

०१) मा.श्रीमती एस.आर.गायकवाड, तदर्थ जिल्हा न्यायाधीश—१ तथा अतीरिक्त सत्र न्यायाधीश, अकोला.

०२) मा.दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), अकोला.

०३) मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, अकोला.

०४) मा.श्रीमती आर.एन.बंसल, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), अकोला.

०५) मा.श्रीमती पी.ए.जमाईवार, सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोला.

०६) मा.श्री.आर.आर.देशपांडे, जिल्हा सरकारी अभियोक्ता, अकोला.

०७) मा.श्रीमती आर.जी.चांडक, माजी प्राचार्य, अकोला गोदा विला, खेडकर नगर, माधुरी कोल्ड्रींक जवळ, एस.बी.आय. कॉलनी नं. ०४, अकोला.

०८) मा.श्रीमती मंगला ए. पांडे, विधिज्ञ, अकोला वकील संघ, अकोला.

०९) मा.श्रीमती एल.बी.दांदळे, विधिज्ञ, अकोला वकील संघ, अकोला.

१०) सौ.आर.बी.दिगंबर, अधिक्षक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला प्रतिनियुक्ती प्रभारी प्रबंधक, कौटुंबिक न्यायालय, अकोला.

११) अधिक्षक, वित्त/निरिक्षण/न्यायीक विभाग, जिल्हा न्यायालय, अकोला.

१२) सहायक अधिक्षक, प्रशासन विभाग/संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, अकोला.

१३) ..........................................................................................

यांना माहिती व योग्य कार्यवाहीस्तव सविनय सादर/सस्नेह अग्रेषित.

प्रभारी प्रबंधक
जिल्हा न्यायालय, अकोला.